# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/11/2023 (बुधवार) सायंकाळ

---

### बॅटरी चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील ताराबोडी शिवार येथे दि.३०/१०/२०२३ चे २३/०० वा. ते दि. ३१/१०/२०२३ चे ०४/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– अभिजीत अरूनकुमार फाले, वय ३१ वर्ष, रा. फ्रेंन्डस कॉलनी आकारनगर नागपुर याच्या ताराबोडी शिवारातील जागेवरून तीन टिप्परमधिल ३ बॅटऱ्या प्रत्येकी १५००/–रू प्रमाणे एकुण किंमती ४५००/– रू व दोन पोकलॅंडच्या ४ बॅटऱ्या प्रत्येकी २०००/– रू प्रमाणे एकुण किंमती ८०००/– रू असा एकुण १२५००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने गाडयाचे कुलुप तोडुन चोरून नेल्या आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोना निलेश उईके पो.स्टे काटोल मो. नं. ९०७५१६२८९६ हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत ५०० मी. अंतरावरील भिसीनाका चौक उमरेड येथे फिर्यादीचे किराणाचे दुकान जगनाडे कॉम्प्लेक्स मध्ये असून दिनांक ३०/१०/२०२३ चे रात्री २०/३० वा. दुकान बंद करून फिर्यादी घरी गेले दि. ३१/१०/२०२३ चे सकाळी फिर्यादीचा मित्र बारेकर यांनी फोनवर करून सांगितले की तुमचे किराणा दुकानाचे शटर तुटलेले दिसत आहे, दुकानात चोरी झाली आहे मित्राचे सांगितल्यावरून फिर्यादी तसेच दुकानात काम करणारा निलेश पाल हे दुकानाजवळ आले तेव्हा दुकानाचे शटर अर्धवट वाकलेले दिसल्याने फिर्यादीला दुकानात चोरी झाल्याचे समजले दुकानाचे आत जावून पाहीले असता सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसले दुकानातून १) अमेरीकेन सिगारेटचे ०५ पुडे प्रत्येकी किंमती २१२०/–रू, एकूण १०,६००/–रू, २)क्रश सिगारेटचे १० पुडे प्रत्येकी किंमती १४७०/–रू, एकूण किंमती १४,७००/–रू, चा व कॅश कांउन्टर मधील नगदी ५,०००/–रू, असा एकूण ३०,३००/–रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पीएसआय वाघ मो. नं. ९९७५८१८४०१ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर